# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे-११
## (महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**वास्तुशिल्प विशारद नेमणुकीबाबत**

डिंभे धरण हुतात्मा बाबू गेणू सैद सागर जलाशयाच्या खालील बाजूस उद्यान विकसित करावयाचे कामासाठी पात्र वास्तुशिल्प विशारद यांची नेमणुक करावयाची आहे. यासाठी या प्रकारचा कामाचा अनुभव असलेल्या इच्छुक वास्तुशिल्प विशारद यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | डिंभे धरण हुतात्मा बाबू गेणू सैद सागर जलाशयाच्या खालील बाजूस उद्यान विकसित करणे. |
| ०२ | वास्तुशिल्प विशारदाच्या कामाचे स्वरुप | डिंभे धरण हुतात्मा बाबू गेणू सैद सागर जलाशयाच्या खालील बाजूस उद्यान विकसित करण्याचे नियोजन व वास्तु आराखडे तयार करणे, संकल्पन तसेच सदर कामाच्या निवीदा मागविण्यासाठी सविस्तर तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणे प्रारुप निवीदा संच तयार करणे इत्यादी. |
| ०३ | विकास कामाचा अंदाजित खर्च | रुपये १६.७८ कोटी |

वरील कामासाठी इच्छुक वास्तुशिल्प विशारद यांनी खालील माहिती सिलबंद पाकीट क्र १ व २ मध्ये दिनांक १५/०७/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता डिंभे धरण विभाग,मंचर यांचेकडे प्राप्त होईल याप्रमाणे सादर करावे.

| | | |
|---|---|---|
| अ) | शैक्षणिक पात्रता | कौन्सिल ऑफ आर्किटेक्टचे प्रमाणपत्र |
| ब) | केलेल्या कामाची यादी | मागिल ३ वर्षातील |
| क) | आयकर विवरणाबाबत | सन २००८-०९ मधील आयकर विवरणाबाबतच्या पत्राची सत्यप्रत. |
| ड) | अपेक्षित शुल्क (टक्केवारीमध्ये) | उद्यान विकास व तत्सम केलेल्या कामाची शुल्क (टक्केवारी) उपलब्ध अनुदानानुसार अदा करण्यात येईल. |

केलेल्या कामाच्या टक्केवारी रकमेवर,आयकर नियमानुसार वसुल केला जाईल व अनामत रक्कम ५ टक्के वसुल केला जाईल. अनामत रक्कम काम समाधानकारकरित्या पुर्ण केल्यानंतर परत करण्यात येईल.
निवड केलेल्या वास्तुशिल्प विशारद यांची कौन्सिल ऑफ आर्किटेक्ट नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार करारपत्र भरुन नेमणुक करण्यात येईल.

सिलबंद पाकीट क्र १ मध्ये शैक्षणिक पात्रता, केलेल्या कामाची यादी, आयकर विवरणपत्राची सत्यप्रत सादर करावी. तसेच सिलबंद पाकीट क्र २ मध्ये उपरोक्त अ.क्र. २ मध्ये नमुद केलेल्या कामासाठी अपेक्षित शुल्काचे दरपत्रक सादर करावे.

सदर नियुक्तीचे अर्ज कार्यकारी अभियंता डिंभे धरण विभाग,मंचर ता.आंबेगांव जि.पुणे यांनी कोणतेही कारण न देता ते नाकारण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

सही/-
कार्यकारी अभियंता
डिंभे धरण विभाग,मंचर
ता.आंबेगांव जि.पुणे
दूरध्वनी क्र. ०२१३३-२२३१५६